नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 02/08/2021 (सोमवार)
(सायंकाळ)

---

## मोटरसायकल चोरी

पो.स्टे. मौदा :- अंतर्गत 10 कि. मी. अंतरावरील वडोदा येथे फिर्यादी नामे- जयेद्रं सोमाजी राहांगडाले, वय 48 वर्ष, बागडी नगर, वडोदा ता. कामठी जि. नागपूर हे श्री जी ब्लॉक कंपनी झुल्लर येथे मजुरीचे काम करतात व त्यांच्या कडे असलेली हिरो फॅशन प्रो मोटार सायकल क्र. एमएच-.40/ऐजी-1788 असून ती फिर्यादीने सन 2013 मध्ये घेतली होती. दि 01/08/2021 रोजी सकाळी 10.00 वा. दरम्यान फिर्यादी हे श्री जी ब्लॉक कंपनी झुल्लर येथे काम करुन दुपारी 03.00 दरम्यान घरी आले असता घराजवळ राहणरा मुलगा आदेश वय अंदाजे 10 वर्ष हा फिर्यादीच्या घरी येवून म्हणाला की "तुमची मोटरसायकल कोणीतरी घेवून जात आहे" असे सांगितल्याने फिर्यादी हे लगेच घराच्या बाहेर येवून पाहीले असता मोटरसायकल दिसून आली नाही. फिर्यादीची कि. 15,000/-रू. मोटरसायकल अज्ञात आरोपीने चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार रविन्द्र बकाल मो.नं. 9834549674 हे करीत आहे.

## जबरी संभोग

पो.स्टे. उमरेड :- दिनांक 01/06/2021 चे 12:00 वा. ते दिनांक 02/06/2021 चे 10.00 वा. दरम्यान 27 वर्षीय पिडीत/फिर्यादी अहिच्या सोबत आरोपी नामे- नवनित अशोक बांगळकर, वय 28 वर्ष रा. आसगाव ता पवनी जि भंडारा ह.मु वडसा जि.गडचिरोली सोबत लग्न जुळले असुन दि 22/02/2021 रोजी फिर्यादीचा आरोपी सोबत संत गजानन मंदिर ता वडसा जि गडचिरोली येथे रितीरीवाजाने साखरपुडा झाला होता. दि 01/06 /2021 रोजी फिर्यादी या आरोपी सोबत बोलल्याप्रमाणे उमरेड शहर जवळील जंगल रीर्टीट गेले होते. आरोपीने 'माझी होणारी बायको आहेस' असे म्हणुन फिर्यादी सोबत शारीरिक संबंध प्रस्थापित केले. तसेच दि 02/06/2021 रोजी च्या सकाळी शरीरिक संबंध प्रस्थापित केले. त्यानंतर आरोपी फिर्यादीला म्हटले की, 'तुझशी लग्न करायचे नाही, मी तुला दुसरा मुलगा पाहुन देतो' वांरवांर लग्नासाठी मिटींग होत गेल्यापण त्यातुन काहीही साध्य झाले नाही. आरोपीने फिर्यादी सोबत लग्न करतो असे म्हणुण फिर्यादीसोबत शारीरिक संबंध प्रस्थापीत केले. फिर्यादी लग्नाचे तारखेचे वाट पाहत होती त्यांचे परिवाराकडुन सुचना न आल्याने फिर्यादीचे तक्रारीवरुन आरोपीविरुध्द सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 376 (1), 417 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनी मिरा मटाले या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर